
# संभाजी



मराठे शाहीचा कालखंड हा संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्ण काळच ठरतो. या काळाचा उद्गाता होता. राजा शिव छत्रपती ! त्यांनी हिंदुस्थानात देशाभिमान, धर्माभिमान जागृत केला. म्हणून त्यांना महाराष्ट्राचा दैवत, देशभक्तांच प्रेरणास्थान हिंदुस्थानचा तारणहार म्हणून गौरविले जाते. त्यांच्या युद्ध कौशल्याचा अभ्यास जगातील अनेक प्रशिक्षण केंद्रात केला जातो. अशा या थोर सेनानी !शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग नव्हे प्रत्येक क्षणच रोमहर्षक आहे.

" स्तुती करावी परमेश्वराची,

करु नये इतर जनांची ।।"

असे परखड पणे बोलणाऱ्या समर्थांनाही छ. शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची भुरळ होती. म्हणून तर त्यांना.

शिवरायाचे आठवावे रुप, शिवरायाचा आठवावा साक्षेप !

शिवरायाचे आठवावे प्रताप, भूमंडळी ।।

असे म्हणण्याचा आणि त्यांना 'श्रीमंत योगी' असे गौरविण्याचा मोह झाला असे हे महाराष्ट्राचं व अवघ्या राष्ट्रभक्तांच दैवत आहे. छ. शिवाजी महाराजांनी प्रतापाचा एक वेगळा मापदंड दाखवून दिला. या शिवप्रतापाने सारी हिंदूभूमी थक्क झाली, विरोधक धास्तावले तर हिंदू सुखावले.

अशा अव्दितीय पित्याच्या कर्तृत्वपूर्ण पार्श्वभूमीवर सभांजी राजांची तुलना होते. महान पित्याच्या कर्तृत्ववान मुलाला इतर लाभाबरोबर हा तोटा नेहमीच सहन करावा लागतो. जीवनात यशस्वी होण्यासाठी कर्तृत्वाबरोबर भाग्याचीही जोड लागते. शिवाजी महाराजांच्या अंगी अलौकिक कर्तृत्व आणि दूर दृष्टी होती. त्यांचप्रमाणे दैवही त्यांना सतत हात देत होती. त्यांनी घेतलेली अफझुलखानाची भेट, त्यांच्या जीवनातले आग्राप्रकरण, यांचा विचार केला तर ते सुदैवी नसते तर अपयश त्यांच्या पदरात पडले असते. महाराजांचे शौर्य, धैर्य दूरदृष्टी, योजकता, कल्पकता, अचाट होती. पण यांच्याच जोडीला दैवानेही त्यांना हात दिला नसता तर या प्रसंगात काय झाले असते. याची कल्पनाही करवत नाही. संभाजी राजांचे जीवन ह्याच्या अगदी उलट होते. ते शूर होते; धैर्यवान, धाडसी, साहसी योजक आणि निपुण होते. परंतु या सर्व गुणांबरोबर नियती त्यांच्या राजमुकूटात यशाचा तुरा लावावयास विसरली होती. असेच त्यांच्या आयुष्याचे अवलोकन करु लागले म्हणजे वाटते.

वारसा हक्काच्या व राजकारणांच्या कचाट्यात अडकलेल्या, वयाने लहान परंतु पराक्रमी सभाजी राजांनी आपणाला कोणी सुद्धा समजून घेत नसून आपण एकाकी पडलो आहोत, आपणाला युवराज पदाची किंमत मिळत नसून आपण उरलो आहेत केवळ दासरी[४२] या भावनेने दौडत्या घोड्याच्या टापेला दोरखंडाने जखडलेल्या सजेच्या कैद्याची व्हावी तशी संभाजींच्या मनाची फरफट होत होती. [४३] अखेरीस संभाजी राजांनी दिलेरखानाला मिळण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे इतिहासात त्यांची बाजू निश्चितच दुबळी ठरली. याच त्यांच्या दुंबळ्या बाजूचा उपयोग करुन तत्कालीन राजकारण्यांनी त्यांना राजगादी पासून दूर सारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी झगडा करुन आपला न्याय हक्क प्राप्त केला.

संभाजी राजे छत्रपती संभाजी महाराज झाले परंतु त्यांच्या बद्‌दलचा कलुषित दृष्टीकोन त्यांच्या हयातीत व त्यांच्या मृत्युनंतरही कित्येक वर्ष बदलू शकला नाही. अर्थात त्याला तात्कालीन बखरकार जेवढे जबाबदार आहेत. तेवढेच काही इतिहासकारही याला जबाबदार आहेत. या सर्वामध्ये मात्र ललित लेखकांनी आघाडी मारलेली दिसते.

शिवाजी सावंत यांनी संभाजी महाराजां सारखा विवाद्य नायक निवडून आपल्या अभ्यासू स्वभावाने आणि अलौकिक प्रतिभेने संभाजी राजांचे संपूर्ण चरित्र सुसूत्रपणे व विवेचनात्मक रीतीने प्रस्तुत करुन त्यांच्या वरील दोषारोपांचे समर्थपणे निर्दालन केले आहे व त्यांना योग्य तो न्याय दिला आहे. [४४] त्यांचे युद्‌ध कौशल्य, प्रजेविषयीची कळकळ राज्य कारभाराची घडी, त्यांची दूरदृष्टी, धडाडी, कल्पकता इ. अनेक गोष्टींवर आपल्या चिंतनाने प्रकाश पाडून शिवाजी सावंतांनी समाजाची परंपरागत दुषितदृष्टी, बदलण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

शिवाजी राजांसारखा संभाजी लोकोत्तर नव्हता, परंतु त्याचे चरित्र आजपर्यंत जसे रंगविण्यात आले तसे ते नसून त्यांच्या ही अंगात अनेक गुण होते. त्यांनी आपल्या कारर्कीदीत सर्वशक्तीपणाला लावून कारभार केला. शिवाजी महाराजां सारखा तो पुरुष सिंह नसला तरी त्या महापुरुषाला शोभेल असाच त्यांचा 'छावा' होता असे[४५] लेखकाने सिद्‌ध केले आहे.

## १) रानभेरी निधडा संभाजी -

आयुष्याची उणीपुरी ३२ वर्ष जगणारा संभाजींच्या जीवन कथेत अनेक गुण प्रकट होताना दिसतात. 'छावा' या कादंबरीत त्यांच्या प्रकट झालेला पहिला गुण म्हणजे 'रानभेरी निधडेपणा' सह्याद्रीच्याकडे कपारीत राज्य करणाऱ्या भोसले कुळातील प्रत्येक पुरुष हा जन्मताच निधडेपणा आपल्या रक्तात घेऊन येतो. संभाजी राजे तरी याला अपवाद कसे राहतील ज्यांच्या माथ्यावरचे मातेचे छत्र

अजाणपणीच हरपले जाते त्यांना परिस्थितीच उदंड शिकवीत असते.[४६] जीवन म्हणजे कितीतरी महान उलथापालथ असते. [४७] या उलथापलथीतूनच माणूस स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत असतो आणि इतरांनाही त्याचा शोध लागत असतो. संभाजी राजांच्या व्यक्तिमत्त्वा मधील निधडेपणा देखील अशाच घटनेतून सावंतांनी वाचकांच्या समोर सादर केला आहे. अंतोजी गाड्या बरोबर तटफेरा करीत असता शंभू राजे अंतोजीच्या हातातील विणलेली गोफण घेतो व त्यामध्ये गोल गुंड बसवून तटाच्यापार कुठच्या कुठ तो भिरकवून देतो. परंतु तो गुंडा रानात काम करणाऱ्या 'भिवजी' कुणब्याच्या पाठीत बसतो. त्याची फिर्याद तो शिवाजी महाराजांपाशी करतो. आपल्या रयतेला बाह्य शत्रूंचा कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये याची दक्षता घेणारे शिवाजी राजे स्वत: कडून अथवा आपल्या कारभाराशी संबंधीत कोणत्याही व्यक्तिकडून आपल्या रयतेला त्रास होणार नाही याची काळजी घेत. साहजिकच भिवजीची कळकळ त्यांना संतप्त करते व ते अंताजी गाडेला कोरडयाची शिक्षा देतात. सदरेवर चाललेला हा प्रकार जेव्हां संभाजी राजांना समजतो. तेव्हा ते आबा साहेबांच्या समोर सर्वासमक्ष आपण गोफण गुंडा फेकल्याची कबुली देतात आणि अंताजीची शिक्षा स्वत: घ्यायला तयार होतात. ह्या प्रसंगात बाळशंभूच्या अंगी भिनलेला निधडेपणा जेवढा भावतो तेवढाच राजांना रक्ताची नाती नसतात ! असली तरी मनाच्या जामदारखान्यात 'मोहरबंद करुन ठेवावी लागतात [४८] असे' मानणारा शिवाजीराजांचा निधडेपणाही वाचकांच्या नजरेत भरतो. परंतु धन्याचा पुत्र असूनही हाताखालच्या चाकरांसाठी शिक्षा भोगायला तयार होणारा शंभू मात्र 'रानभेरी' असल्याची खात्री पटते.

संभाजी राजांच्या अंगी असणाऱ्या या निधडेपणाचा उपयोग करुन घेत शिवाजी महाराजांनी शत्रुच्या अनेक कटांचा सहज बिमोड केला आहे. त्याच सोबत वडीलांना वाचविण्यासाठी त्यांची मानहानी टाळण्यासाठी संभाजीने देखील आपला निधडेपणा पणाला लावलेला दिसतो. औरंगशहाशी केलेल्या तहाची तामिली करताना शिवाजीराजांनी केवळ ७-८ वर्षांच्या बच्च्या संभाजीला रजपुतांच्या गोटात ओलीस ठेवले. अशा परक्या ठिकाणी, परक्या माणसांच्या असताना सुद्धा संभाजीने आपला स्वाभिमान सोडला नाही. 'क्यो फर्जंद संभू तुम्हे नही आया बुखार ?' अंगावर काहीही घेण्याची सवय नसलेला संभाजी उतरतो "आम्हास बुखार येत नाही ! आमच्यामुळे इतरांस बुखार येतात !" असे उत्तर देणारा संभाजी मनावर कोरला जातो. या शिवाय मदमस्त हत्तीला स्वत:जवळ जाऊन गवताची पेंडी चारणारा संभाजी, दिलेरखानाच्या रांगडी थट्टेला आपल्या सह्याद्री बोलाने अवाक करतो आणि आग्राहून परतत असताना केसोपंत त्रिमलाकडे बटू ब्राहमणाच्या रुपात राहून शत्रु राज्यातून पायी चालत स्वराज्यात परततो. एवढ्या बाल वयात अशा रानभेरी निधडेपणाचा आदर्श इतिहासात क्वचितच सापडेल. परंतु

हाच निधडेपणा अनेक प्रसंगात संभाजीच्या चारित्र्याला कमी पणा देण्यास कारणीभूत झालेला दिसतो. कारण मानवी जीवन अनपेक्षित धक्के देणारेच असते. आण्णाजी सुरनीसांची कन्या गोदावरी घरपणासाठी आली असता तिला पाहून निष्पाप भावनेने एखाद्या बालका प्रमाणे जाऊन तिची चौकशी करणारा संभाजी मात्र इतरांच्या नजरेला भलताच रसिक वाटला आणि संभाजीच्या संपूर्ण चारित्र्यावर विषारी अफवांचा द्रव पसरला. माणसाने उमदे असणे हे जेवढे मोलाचे आहे त्याहून सावध असणे हे अधिक मोलाचे आहे.[४९] ह्याचा विसर संभाजी राजांना पडला आणि आयुष्यात त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. याच अफवांना वैतागून त्यांनी अखेर दिलेरची साथ दिली. मात्र आपली चूक लक्षात येताच ते पुनश्च स्वराज्यात दाखल झाले व वडिलांच्या समोर निधडेपणाने गेले छ. शिवाजी महाराजांनी आपल्या पुत्राला समजून घेतले पण बखरकार, इतिहासकार आणि लेखकांनी मात दतंकथा - आख्यायिकाच रंगवल्या इतिहासातील पात्रे रंगविणाऱ्यां संभालीला जाणून न घेता त्याला गुन्हेगार ठरविले.

शिवाजी महाराज व संभाजी महाराज जरी शौर्य, पराक्रम, साहस याबाबतीत सारखे असले तरी संभाजी महाराज हे कवी प्रतिभेचे असल्या कारणाने ते भावनाप्रधान दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. परिणामी भावनेच्या आहारी जाऊन संभाजी महाराजांनी काही चुकींचे निर्णय घेतले असे सिद्ध करुन संभाजी राजांच्या चारित्र्याला लंगडेपणा देणारी बाजू आपल्या परीने सावरण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

## २) न्यायाला कौल देवून अन्यायाचा बिमोड करणारा संभाजी -

शिवाजी महाराजांचे संपूर्ण आयुष्य हे एखाद्या तुफाना सारखे होते. त्यामुळे त्यांना आपल्या मुलाकडे लक्ष देण्याची देखील फुरसत नव्हती. साहजिकच संभाजी महाराजांच्या पालन पोषणाची जबाबदारी जिजाबाईच्याकडे आली. रामायण, महाभारत, पुराणातील कथा, ऐकवतच जिजाबाईनी आपल्या अनुभवाचे तुळजाई बोल संभाजीच्या तनामनात भिनवले. परिणामी सत्याची बाजू लढविणाऱ्या भोसल्यांच्या रक्तातील न्यायीपणा संभाजीच्या रक्तात जास्तच घट्ट होत गेला. न्यायाची बाजू घेण्याच्या त्यांच्या हया स्वभावाला अधिक प्रखरता मिळाली ती 'धाराऊ' सारख्या स्त्रीच्या वात्सल्य रसाच्या प्राशनाने. धाराऊंच्या दुधामुळेच कदाचित संभाजीराजांना सर्व सामान्यांच्या व्यथा वेदना लवकर समजल्या असाव्यात.

इतिहासकारांनी, साहित्यिकांनी जरी संभातीला उग्र प्रवृत्ती [५०] संबोधले असले तरी शिवाजी सावंतांनी त्यांना आपल्या कादंबरीत प्रजेच्या स्वास्थाची व स्थैर्याची हमी घेणारे प्रजादक्ष महाराज म्हणून रेखाटले आहे.

रायगडावर मौजीबंधन पारपडल्या नंतर संभाजीला युवराज पदाचा मान मिळाला. आणि शिवाजी महाराजांनी संभाजी राजांना दिवाणी कामकाजाचे शिक्षण द्यायला सुरूवात केली. तिथूनच पुढे संभाजी राजांनी अनेकांचे कथले, तंटे, वाद-विवाद डोळयावर पट्टी बांधून न्याय देवतेच्या भूमिकेतून कोणा एकावर अन्याय न करता लिलया सोडविलेले दिसतात. आपल्या रयतेवर होणारा अन्याय मग तो सामाजिक असेल, राजकीय असेल, आर्थिक असेल अथवा धार्मिक असेल त्या प्रत्येकाचा बिमोड संभाजी राजांनी केला आहे.

'लोकधारा : दुष्परिग्रहा'[५१] या समर्थ वचनाप्रमाणे वागणारे आणि दुर्बलांच्या हक्कांचे संरक्षण करणे हेच खरे 'राजेपण'[५२] संभाळणारे संभाजी राजे होते.

### ३) कवी प्रतिभेचा राजा संभाजी :-

मल्लखांब, दांडपट्टा, तलवार, तीरकमान, गोफणफेक अशा सैनिकी रांगडया कार्यात वावरणाऱ्या संभाजीला एक वेगळीच ईश्वरी देणगी लाभली होती. ती म्हणजे त्यांच्याजवळ कवी प्रतिभा होती. त्याचा शोध शिवाजी महाराजांनाच प्रथम् लागलेला दिसतो.

आऊसाहेबांची व सोनोपंत डबीरांची सुवर्णतुला करण्यासाठी शिवाजीराजे व संभाजीराजे ज्यावेळी महाबळेश्वरला गेले. तेव्हा सूर्य मावळतीला लागला होता. त्यांच्या लांबट किरण फेकीत भोवतीचा परिसर देखणा दिसत होता. शंभूराजे भोवतीच्या मुलखाचे सुरूपण बघताच हरखून गेले, व गरगर नजर फेकीत ते मिळेल तेवढे सारे डोळ्यात साठवून घेऊ लागले. त्यांना काहीतरी जाणवत होते. पण ते नीट पारखता येत नव्हते. त्यांची ही घालमेल आबासाहेबांनी पाहिली. तेंव्हा संभाजीराजे वडीलांना म्हणाले, "हे डोंगर, हे आभाळ, पक्षी, झाडे आमच्याशी बोलू बघताहेत असं आम्हास वाटतं." संभाजीचे हे बोल ऐकल्यानंतर आबासाहेबांनी त्याच्या कपाळावरील आडव्या शिवगंधाकडे पहात म्हणाले , झाडापेडांची बोलीभाषा कळायला योग्याचं किंवा कवीचं मन लागतं ! फार थोड्यांना ते मिळतं.[५३] ह्याच प्रसंगात संभाजीराजांचे कवीपण वाचकांच्या समोर येते.

या प्रसंगान व्यतिरिक्त झाडावरून खंडयाने सुर मारून तलावातील मासळी उचलून तो होत्याची नव्हती करणाऱ्या खडयाची शीळ ऐकून समाधानी होणारे संभाजीराजे वाचकांना भेटतात. तसेच

वेरूळच्या कैलास लेण्यांना पाहताच हा संभाजी स्वतःच्या अस्तित्वाला विसरतो. तर कुशावर्ताच्या टाक्याजवळ असणारे नानारंगी कमल फुलांचे थाळे बघून संभाजी जागीच खिळून बसतो.[५४] संभाजी राजांच्या या काव्य प्रतिभेला स्फुरण चढते ते कवी कुलेशच्या सांगाती. तख्ते ताऊस औरंगशहाच्या तावडीतून पळून येत असतानाच्या प्रवासात झालेली ही भेट पुढे संभाजीराजे व कवी कुलेशच्या अमर मित्रत्वाच्या रूपात रूपांतरीत होते. परिणामी संभाजी राजांची काव्य प्रतिभा पुराण शास्त्राच्या अभ्यासाने उत्तरोत्तर बहरतच जाते.

पराक्रमी, शूर, राजनितीज्ञ, कर्तृत्वसंपन्न , व्यक्तिमत्व असणारे संभाजीराजे काव्य, अलंकारशास्त्र, पुराणे, संगीत यात सुद्धा अग्रस्थानी होते.[५५] त्यामुळे वेळ मिळताच ते शास्त्रावर काव्यलक्षणावर चर्चा करताना दिसतात. आपल्या दरबारात आलेल्या प्रत्येक कलावंताचा ते योग्य तो आदर सन्मान करताना दिसतात. व आपले युवराजपण विसरून त्यांच्या कलेची वाखाणणी करताना दिसतात.

गोंधळी गीतावर भान हरपून तुळजा भवानीचा पोत नाचविणारे, समर्थ रामदासांच्या शब्द प्रपंचावर अंर्तमूख होऊन विचार करणाऱ्या संभाजी राजांनी 'नखशिखा'[५६] बुधभूषणम या संस्कृत काव्यग्रंथाची आणि 'नायिका भेद' या काव्याची रचना केलेली दिसते. अशा या रांगडया संभाजीच्या मनात कवी संभाजी देखील वास करीत होता. या प्रत्यय शिवाजी सावंतांनी वाचकांना आणला आहे.

### ४) समर्थांच्या चरणावर निष्ठा वाहणारा धार्मिक प्रकृत्ती संभाजी :-

लढाईच्या मैदानात, शास्त्रपुराण, काव्यलक्षणेच्या चर्चेत रमणारा संभाजी स्वभावताच धार्मिक स्वभावाचा होता. हा स्वभाव त्यांना त्यांच्या आबासाहेबांच्या कडून आणि आऊसाहेबांच्या कडून प्राप्त झालेला दिसतो. कुलस्वामिनी तुळजाभवानीचा जळता पोत हातात घेऊन तिच्या भुत्याचे रूप बनून

आदिशक्तीचे कौतुक मोठे ।

भुल्या मज केले ॥

या गोंधळ गीतावर बेभान होऊन नाचताना दिसतो.[५७] तर वडीलांप्रमाणे कवडयाची माळ गळयात, लेऊन मुखात 'जगदंब, जगदंब' चा जप करणारा संभाजी अनेकदा कादंबरीत दिसतो. तसेच हिंदूंच्या देवदेवतांची विटंबनापाहून त्यांच्या काळजाला ठणका लागतो.

छ. शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्यात समर्थ रामदासांना आदरयुक्त स्थान दिले होते. साहजिकच संभाजी महाराजांच्या मनात सुद्धा समर्थ आणि समर्थ शिष्य परिवाराबद्दल अपार आदर

होता. म्हणून तर दंड, मनगटात रूद्राक्षांची टपटपीत कडी आवळलेली. दाढीधारी सतेज 'दिवाकर गोसावींना' पाहताच संभाजी त्यांच्यापुढे नतमस्तक झाले. दिवाकरांनी समर्थ उपदेशाचे आणलेले पत्र ऐकीत असताना संभाजीराजे तर आपल्या कानाचे ओठ करून ते अमृतबोल प्राशीत होते. आणि मनोमन समर्थांची आकृती डोळयासमोर उभी करण्याचा प्रयत्न करीत होते. समर्थ रामदासांच्या दासबोधाने तर ते पूर्णपणे भारावूनच गेले होते. त्यातील श्लोकांचा ते प्रसंगानुरूप आठव करीत असत आणि त्यांच्या अर्थाची चिकित्सा सुद्धा करीत असत. शिवथर घळीच्या भेटीत तर संभाजीराजे समर्थांच्या व्यक्तिमत्त्वावर पूर्णपणे भाळलेले दिसतात.[५८]

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी आलेल्या 'गागा भट्टाना' भेटण्यासाठी तर संभाजीराजे स्वतः चालत गडावरून उतरले होते. साधुसंतांच्या ठायी एवढी निष्ठा बाळगणाऱ्या संभाजीच्या हातून एकदा उत्साहाच्या भरात वाघाची शिकार झाली, तेव्हा आबासाहेबांनी त्यांना आपण जगदंबेची भुत्ये आहोत आणि वाघ जगदंबेच्या बैठकीचे जनावर आहे. याची भूल इतःपर कधी पडू देऊ नका.[५९] अशी जाणीव देताच संभाजीराजे शरमिंदा झाले. तर शहाआलमच्या हातून वनगाईंची शिकार होताना पाहून त्यांचा प्राणांतक हंबरडा ऐकून त्यांनी आपले डोके क्षणभर गच्च मिटून घेतले.

वडीलांप्रमाणेच देवदेवता, सतपुरूष, यांच्या आशीर्वादावर आणि कृपेवर संभाजी महाराजांचा नितांत विश्वास होता. वडीलांच्या मृत्युनंतर वारसा हक्कासाठी त्यांना जे लढावे लागले त्या दुःख मनःस्थितीत त्यांना संतांचा आशीर्वाद हवा होता.[६०] त्यासाठी ते वेगवेगळ्या संतांच्या दर्शनाला जात असत, तसेच पित्याप्रमाणे देवस्थाने, मठ सतपुरूष यांना त्यांनी वार्षिक नेमणुका दिल्या होत्या. याच सोबत संभाजी महाराजांनी शृंगारपूरला कलशाभिषेक देखील केला होता. परंतु तत्कालिन राजकारण्यांनी व त्यांच्या सग्या सोयऱ्यांनी त्यांच्या ह्या कृतीबद्दल अफवा पसरवून त्यांना दोषी ठरविले.[६१] या शिवाय त्यांनी कवी कुलेशच्या आग्रहाखातर 'पुत्रकामेष्टी यज्ञ' देखील केला होता.

काही अभ्यासकांनी व इतिहासकारांनी संभाजी राजांनी रामदासांचा एका प्रसंगात अपमान केला आहे. असे जरी म्हणले असले तरी 'छावा' मध्ये मात्र संभाजीराजे हे समर्थांना आपल्या वडीलांच्या ठायी मानताना दिसतात. त्यामुळे समर्थ रामदासांच्या निर्वाणानंतर ते अस्वस्थ होतात. काही काळानंतर त्यांनी समर्थांच्या पादुकांची स्थापना करून त्यांच्या पुण्यतिथीच्या खर्चासाठी नेमणूक करतात. याशिवाय याशिवाय त्यांनी कराड, सातारा, सज्जनगड, शिंगणवाडी, महाबळेश्वर, चाफळ इ. अनेक ठिकाणी समर्थांनी घातलेल्या रितीप्रमाणे उत्सव व्हावे म्हणून सूचना आणि वार्षिक अनुदाने दिलेली आहेत.[६२]

हिंदुस्थानात परकीयांचे राज्य स्थापन झाल्यापासून हिंदूंना बाटविण्याचे कार्य जोरात चालले होते. दुदैवाने परधर्मात गेलेल्या आपल्या धर्मबांधवांना पुनश्च हिंदू धर्मांत घेण्याची तरतुद नाही. परंतु छ. शिवाजी महाराजांनी समर्थ वचनाप्रमाणे -

सकल लोक एक करावे ! कारभारी कार्यी लावावे ॥[६३] - वागून धर्मांतरीत झालेल्या 'नेताजी पालकर, बजाजी निबांळकरांचे ' शुद्धीकरण करून त्यांना हिंदू धर्मात घेतले. तोच कित्ता संभाजी महाराजांनी गिरविला. त्यांनी औरंगशहाच्या जबरदस्तीने यवन झालेल्या 'गंगाधर कुलकर्णी' ला रायगडावरील दरबारात शुद्ध करून घेतले. स्वधर्माबद्दल इतका ज्वलंत अभिमान असणाऱ्या संभाजी राजांनी मात्र परधर्मियांचा आणि त्यांच्या पवित्र स्थळांचा कोणत्याही प्रकारे उपमर्द केलेला दिसत. उलट त्यांनी आपल्या लष्कराला कोणत्याही धर्माच्या देवस्थानांना उपद्रव न देण्याचे फर्मावले होते.

संभाजी राजांच्या हया धार्मिक स्वभावाचा मात्र एके ठिकाणी अतिरेक झालेला दिसतो. आपल्या कार्यात आशीर्वाद कमी पडत असल्याची खंत ते कवी कुलशेच्या पाशी व्यक्त करतात. तेंव्हा कवी कुलेश महाराजांना मानसीक आधार देण्यासाठी शृंगारपूरात 'बंगाल' मधील 'शाक्त' पंथांच्या अनुयायांना पाचारण करतो व त्यांच्याकरवी शाक्त पंथाची अतिशय कडक उपासना करवून घेतो. मात्र संभाजीचे विरोधक या संधीचा बरोबर फायदा घेतात. आणि कवी कुलेशने वशीकरण मंत्राच्या सह्याने संभाजी राजांचा बुद्धिभ्रंश केला असून ते दोघेही व्यवस्थित पणे कारभार करू शकत नाही.[६४] अशी अफवा उडवितात. काही कालावधी नंतर महाराज रायगडावर परत येतात.

शिवाजी सावंत यांनी या ठिकाणी परकीयांच्या बरोबरच स्वजनांकडून फसविल्या गेल्याने व्यथित आणि कष्टी अवस्था झाल्या कारणाने संभाजीराजे मदिरापानाचा काही काळ आधार घेतात व कवी कुलेशच्या समजवण्याने ते पुनश्च रायगडावर परततात. असा प्रसंग उभा करून संभाजी राजांवरील व कवी कुलेश वरील आरोपाला आपल्या परीने फिके पाडतात.

सारांश छावा मधील संभाजी हा हिंदू पतपातशः व गोब्राम्हण प्रतिपालक या बिरुदावलीला साजेल असाच आहे.

## ५) कुटूंबियांच्या भावगुंतव्यात अडकलेला :-

लहानपणीच मातृछत्राला पारख्या झालेल्या संभाजीला 'जिजाबाई' च्या रूपाने आईचे प्रेम मिळाले. तर 'धाराऊ' सारख्या दूध आईच्या रूपाने त्यांना जातिवंत वात्सल्याचा प्रेमळ झराच प्राप्त झाला. ह्या दोघींच्या प्रेमळ वात्सल्य पाशात संभाजीचे संपूर्ण जीवन अडकले होते. दासी असून सुद्धा

त्यांनी धाराऊला आपल्या मातृस्थानीच मानले होते. अशी धाराऊ जेव्हा आई साहेबांच्या जवळ कापूर होळास जाण्याचा विचार व्यक्त करते. तेव्हा संभाजी धाराऊला एवढेच म्हणतात, "तुझ्या बरोबर आम्हीही येऊ कापूरहोळास " तेव्हा धाराऊ चक्करली व उद्गारली "लेकरा तुज्यामागनं मसणोटीत जाया दिकुल पाय माग हटायचे नाहीत माजं ! लई गुंतवा झालाय रं माज्या वासरा तुज्यात !"[६५] हाच गुंतवा संभाजी ही धाराऊ मध्ये करून होता. पाठीवर मायेची थाप भरली तर धावणीचे मुके जनावर सुद्धा इमानाची स्वारीसंगत देते ! ही तर मन असलेली हाडामासाची माणसं होती.[६६]

आयुष्यातील प्रत्येक कठीण प्रसंगी संभाजी राजांना 'जिजाबाईची' आठवण झाल्यावाचून रहात नाही. 'शंभुबाळ' हया त्यांच्या एकाच सदिने संभाजी राजांना कैक रायगड पेलण्याचे बळ प्राप्त होत असे.[६७]

संभाजी राजांना एकूण सात सावत्र माता होत्या 'सगुणाबाई, सकवारबाई, (गायकवाड), काशीबाई (जाधव), पुतळाबाई, सोयराबाई (मोहिते), लक्ष्मीबाई (विचारे), गुणवंताबाई (इंगळे) मात्र शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी त्यांच्या फक्त चार बायकाच जिवंत होत्या. तसेच संभाजी राजांना कमलाबाई, राजकुंवरबाई, आमणाबाई (अंबिकाबाई ) अशा सावत्र भगिनी आणि राजाराम नावाचा सावत्र बंधू होता. एवढया भरल्या कुटूंबात मात्र संभाजी राजांना अगदी मोजक्या व्यक्तींच्या कडूनच प्रेम आणि आदर मिळालेला दिसतो.

संभाजी राजांना दोन पत्नी होत्या येसूबाई, दुर्गाबाई, तसेच भवानीबाई नावाची मुलगी, मदनसिंह, शिवाजी (शाहू) नावाचे पुत्र होते. या प्रत्येकाशी संभाजी महाराज आंतरिक नात्याच्या भावबंधनात पूर्णपणे अडकलेले होते. हे शिवाजी सावंतांनी अनेक प्रसंगातून चित्रीत केले आहे.

वारसा हक्काच्या राजकारणाला आणि सोयराबाईंनी उठवलेल्या अफवांना वैतागून संभाजीराजे दिलेरला मिळतात. मात्र आपली चूक लक्षात येताच, जीवाचा आकांत करून स्वराज्यात परतात. मागे मात्र पत्नी दुर्गाबाई, पुत्र मदनसिंह, व बहिण राणीअक्का दिलेरच्या कैदेत सापडतात. तेव्हा सवते राज्य कमवायला गेल्यावर कबिला गमावून येण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर येते. नजर किल्ल्यात कैद असणाऱ्या आपल्या कुटूंबांची त्यांना वारंवार आठवण येत असते. त्यांना सोडविण्यासाठी राजे अनेकदा प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. मात्र अदृष्टीने त्यांच्या भाळी स्वजनांचा वियोगच निश्चित केला होता.

वारसा हक्काच्या राजकारणामुळे संभाजी राजांच्या जीवनातील काही काळ हा वाळवंटासारखा रूक्ष व रखरखीत झालेला होता. अशा परिस्थितीत त्यांच्या मनाला मनाला थंडावा देण्याचे काम करीत

होत्या ते त्यांच्या प्रथम पत्नी आणि श्रीसखी 'येसूबाई.' हुलग्याचे वाफाळणारे माडगे चाखीत आपल्या पत्नीची फिरकी घेणारे संभाजीराजांमधील व येसूबाई मधील भावबंध अत्यंत ह्दयस्पर्शी स्वरूपात शिवाजी सावंतांनी कादंबरीत चित्रीत केले आहे. 'नखशिखा' हया काव्यावरून आपल्या पत्नीच्या लाडीक रागाला डिवचणारे संभाजीराजे ज्यावेळी 'छत्रपती' होतात. तेव्हा आपल्या पत्नीने आपली घेतलेली काळजी व आपल्या सवे तिची झालेली फरफट आठून कठीण परिस्थितीतही आपल्यावर पूर्णपणे विश्वास टाकून राहीलेल्या आपल्या प्रिय भार्येला ते 'श्रीसखी' अशी उपाधी देतात व स्वराज्याच्या शिक्के कटयारीचा अधिकार तिच्या सुपूर्द करतात.

वारसा हक्काचे राजकारण सुरू व्हायला जो निमित्त होता. तो राजाराम संभाजीचा सावत्र बंधु परंतु तो या राजकारणात कुठे सुद्धा सामील नव्हता. कारण तो वयाने लहान होता. अशा राजारामांचा आपल्या पुत्राप्रमाणे सांभाळ करणारा संभाजी छावा मध्ये वाचकांना दिसतो. सावत्रमातापैकी संभाजीवर पुत्रवत प्रेम केले ते केवळ 'पुतळाबाई' मात्र त्यांना ही संभाजी राजांना स्वतःच्या हाताने चूड द्यावा लागला.

संभाजी महाराजांची ही रक्ताची नाती होती. परंतु या व्यतिरिक्त त्यांच्या भावविश्वात वावरणाऱ्या अशा दोन व्यक्ती होत्या, की ज्या त्यांच्या रक्ताच्या नात्यातील नव्हत्या. परंतु संभाजी राजांच्या भावविश्वात त्यांना अत्यंत जिव्हाळयाचे व आर्त स्थान होते. त्या म्हणजे 'कापूर होळची धाराऊ' आणि 'कवी कुलेश'. गरजेतून, प्रसंगातून निर्माण झालेल्या या नात्यांनी मराठयांच्या इतिहासात एक वेगळाच आदर्श निर्माण केलेला दिसतो. धाराऊ ही तर संभाजीची दूध आई होती. मात्र तिने संभाजीला सख्या पुत्रापेक्षा जास्त सांभाळलेले आहे. संभाजीने ही तिला आपल्या आयुष्यात मातेचेच किंमती स्थान दिलेले दिसते. त्यामुळे प्रत्येक कठीण समयात त्याने धाराऊचा चरणस्पर्श करून तिचा आशिर्वाद घेतलेला आहे. आपल्या कुटूंबियांची तुला करणारा संभाजी धाराऊची सुद्धा तुला करतो. एवढेच नव्हे तर धाराऊच्या दोन पुत्रांना रक्ताच्या नव्हे पण दुधाच्या नात्याने आपले बंधू मानतो. असा औदार्य पूर्ण असणारा संभाजी धाराऊच्या निर्वाणानंतर तिची समाधी बनवतो व तिला राजघराण्यातील व्यक्तीचा सन्मान देतो.

औरंगशहाच्या कचाटयातून पलायन करीत असताना मदतीला आलेल्या कनुजी भाषिक कवी कुलेशचा संभाजीशी परिचय होतो. याच परिचयाचे पुढे गाढ मैत्रीत रूपांतर होते. अर्थात कवी कुलेश व संभाजीराजे यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होण्यासाठी एक मुख्य गोष्ट कारणीभूत झालेली दिसते

ती म्हणजे त्या दोघांच्या ही जवळ असणारी कवी प्रतिभा.

संभाजी राजांना भेटावयास म्हणून आलेला कवी कुलेश राजांच्या आग्रहाखातर स्वराज्यात थांबतो आणि इथलाच होऊन जातो. एवढेच नव्हे तर संभाजीराजांच्या अनेक मोहिमा तो संभाजीचा 'कुल अख्यातर' म्हणून पूर्ण करतो. आणि अष्टप्रधानात 'छंदोगामात्य' म्हणून ही पदवी मिळवतो. संभाजीराजांशी काही मोजक्याच व्यक्ती एकनिष्ठ होत्या. त्यात कवी कुलेश हा त्यांचा सर्वात स्वामिनिष्ठ सेवक होता. मात्र इतिहासकारांनी, बखरकारांनी त्याच्याविषयी बरीच विपर्यस्त माहिती निर्माण केली आहे. तो कलिचा अवतार असून तो स्वराज्याचे उच्छेदन करण्यासाठी आला आहे. असा गैरसमज त्याच्या बद्दल पसरावयास सुरूवात केली होती.[६८]

परंतु शिवाजी सावंतांनी त्याचे अगदी वेगळे चित्र 'छावा' मध्ये वाचकांच्या समोर उभे करून त्याला मित्रत्वाचा आदर्श बनविला आहे. अशा मित्राबद्दल संभाजी राजे सुद्धा अतिशय साह्दय होते.

सारांश - शत्रुवर जरब बसविणाऱ्या या संभाजीच्या निधडया छातीत आप्त स्वकीयांच्या काळजीने व्याकुळ होणारे मन होते.

## ६) वडीलांना आदर्श माननारा संभाजी :-

शिवराजासी आठवावे । जीवित्व तृणसमान करावे ॥

यहलोक परलोक तरावे । कीर्तिरूपे ॥

शिवराजांचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ॥

शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥

शिवराजांचे कैंसे बोलणे । शिवराजांचे कैसे चालणे ॥

शिवराजाची सलगी देणे । कैसी आहे ॥

सकल सुखाचा त्याग । करुनि साधिजो तो योग ॥

राज्य साधावया लगबग । तैसी करावी ॥

त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरूष ॥

या उपरी आता विशेष । काय ल्याहावे ॥[६९]

हनुमंताला आपल्या फोडलेल्या छातीत रामप्रभुंचे दर्शन झाले तसे आम्हास महाराज साहेबांचे होईल.[७०] असे म्हणणाऱ्या संभाजीची आपल्या वडीलांच्या ठायी किती भक्ती होती हे लक्षात येते. याच भक्तीचे समर्थ रामदासांनी आपल्या रामतीर्थी बोलाने श्रद्धेत रूपांतर केलेले दिसते.

'छावा' या कादंबरीत शिवाजी सावंतांनी संभाजी महाराजांना वडीलांच्या बारीक सारीक गोष्टी लक्षात ठेवणारा त्यांची प्रत्येक आज्ञा शिरसावंदय माननारा असे दाखविण्यात परिपूर्ण यश मिळवले आहे.

काही बखरकारांनी व इतिहासकारांनी संभाजीराजे व शिवाजी महाराज यांच्यात गैर मिलाफ असून त्यातूनच चिडून जाऊन संभाजी राजांनी वडीलांना विषप्रयोग केला असे म्हंटले आहे. तरी 'छावा' कादंबरीत मात्र संभाजीराजे वडीलांना देवता स्वरूप मानताना दिसतात. म्हणून तर ते वडीलांच्या अपमानाच्या प्रसंगी स्वतःहून सामोरे गेलेले दिसतात आणि वडीलांची मानहानी टाळलेली दिसते.

दिलेरला मिळालेले आणि पुनश्च स्वराज्यात परतलेले संभाजी आपल्या चुकीच्या निर्णयामुळे वडीलांना किती यातना झाल्या असतील याचा विचार करताना गलबलून जाताना दिसतात. वारसा हक्काच्या राजकारणाला सुरूवात करून संभाजीच्या जीविताला धोका देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सोयराबाईवर संभाजीराजांनी वडीलांच्या इच्छेखातर कोणताही राग धरला नव्हता. कारण थोरली चुकली तरी तुम्ही सोसण सोडू नका हया वडीलांच्या उद्‌गाराला त्यांनी ब्रिद वाक्य मानले होते.

वडीलांच्या पाऊलावर पाऊन टाकून वाटचाल करणाऱ्या संभाजी राजांनी ज्या प्रमाणे कौटुंबिक, सामाजिक क्षेत्रात वाटचाल केली त्याचप्रमाणे त्यांनी राजकीय क्षेत्रात सुद्धा वडीलांच्याच आदर्शाचाच पाठपुरावा केलेला दिसतो.

शिवाजी राजांनी ज्याच्या ठायी सख्य धरले त्याच्या ठायी संभाजी राजांनी ही सख्य धरले. एवढेच नव्हे तर वडीलांनी ज्याच्याशी शत्रुत्व केले त्याला संभाजी राजांनी सुद्धा शत्रुत्व दिले. असे असताना सुद्धा संभाजीराजे वडीलांना डावलून दिलेर खानाला मिळाले. अर्थात याला कारण म्हणजे गोदावरी प्रकरणांचा विपर्यस्त अर्थ लावून संभाजीच्या चारित्र्याची संपूर्ण हेटाळणी झाल्या कारणाने संभाजीच्या मनात आपण एकाकी पडल्याची व आपल्याला युवराज म्हणून कोणीही किंमत देत नाही. अशी शंका त्यांच्या मनात उभी राहीली. बाहयशत्रुशी दोन हात करून त्यांच्या निष्पात करता येतो. परंतु शंका निर्माण झाली तर ती संपूर्ण मनस्वास्थ नष्ट करते. अशा वेळी गरज असते ती त्या शंकेची संपूर्ण निरसन करण्याची परंतु संभाजी राजांनी शंकेचे निरसन करून न घेता भावनेच्या आहारी जाऊन सज्जनगड सोडण्याचा निर्णय घेतला. असे चित्रण शिवाजी सावंतांनी 'छावा' मध्ये केले आहे.

वरील घटना वगळता संभाजीराजांनी अंर्तगत व परसत्ताक प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या वडीलांचाच आदर्श समोर ठेवलेला दिसतो. सारांश संभाजीराजा म्हणजे वडीलांचा आदर्श माननारा एक आदर्श पुत्रच होता.

## ७) वारसा हक्काच्या कलहातून मार्गक्रमण करणारा संभाजी :-

संभाजी महाराजांच्या केवळ बत्तीस वर्षाच्या आर्युमर्यादेत त्यांना बालपणात आजीचे प्रेम, ममता आणि छत्र लाभले. तेवढाच त्यांच्या आयुष्यातील शांततेचा काळ सोडला तर इतर वेळी त्यांच्या विषयी सतत गैरसमज पसरत होते. ते त्यांच्या हौतात्म्यानंतर जवळजवळ तीनशे वर्ष रूढ आहेत. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होई पर्यंत संभाजीराजांचे आयुष्य सुरळीत होते. मात्र संभाजीराजांना युवराज पद मिळाल्यापासून त्यांची सावत्र माता सोयराबाईने आपला मुलगा 'राजाराम' हयाला राजपद मिळावे अशी अभिलाषा धरली. तेव्हापासून भोसले घराण्यात गृहकलह सुरू झाला आणि संभाजीच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. आणि त्यांच्या जीवनात जो झंझावात सुरू झाला त्याचा त्यांच्या दुर्दैवी अंतानेच शेवट झाला.

आसक्ती मग ती पैशाची असेल, स्त्री प्राप्तीची असेल, अथवा राजसत्ता प्राप्तीची असेल ती नाशाकडेच नेते. सोयराबाईच्या मनात सुद्धा राजारामला राजपद मिळवून देण्याची अभिलाषा निर्माण झाली. आणि भोसल्यांच्या उभ्या राज घराण्याच्या भवितव्याची नक्षी कुणालाही उकलता येणार नाही अशी गुंतू लागली.[७१] गोदावरीच्या प्रकरणावरून रुष्ट झालेल्या आण्णाजी पंतांनीही हा गुंता अधिकच वाढविला. असा गुंता वाढायला संभाजींच्या हातून घडलेले प्रमादसुद्धा तेवढेच कारणीभूत असलेले दिसतात. गोदावरी प्रकरण अथवा दिलेर खानाला जाऊन मिळणे या घटनांमुळे वारसा हक्क ांच्या राजकारणात संभाजीराजांची बाजू निःसंशय दुबळी ठरताना दिसते.

जिजाऊ आई साहेबांचा झालेला मृत्यू व शिवाजी महाराजांचा झालेला मृत्यू हया दोन घटनासुद्धा हया राजकारणाला भरीसच घालताना दिसतात. जिजाऊ साहेबांच्या एक दरारा संपूर्ण परीवारावर होता. त्यातच संभाजी हा जिजाऊंचा लाडका होता, मात्र त्यांच्या मृत्यूमुळे सोयराबाईकडे हा मोठेपणा आला. साहजिकच हा मोठेपणा आपल्या मुलाकडे किंबहुना आपल्याच मुलाच्या वंशात रहावा असा स्वार्थ त्यांच्या मनात निर्माण झाला. व त्यांनी सुडाच्या राजकारणाला सुरूवात केली.

तर अंतिम समयी शिवाजी महाराज हे पूर्णपणे मरणासन्न अवस्थेत होते. त्यामुळे गडावर व गडाच्या बाहेर काय हालचाली आहेत. याच्या वार्ता त्यांना सोयराबाईच्या मुखातूनच समजत. साहजिकच

सोयराबाईंनी हया संधीचा फायदा घेत होत्या व शिवाजी महाराजांची कोणतीही खबर गडाच्या खाली जाऊ देत नव्हत्या. शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला तेव्हा संभाजीराजे पन्हाळ गडावर होते, परंतु त्यांना ही खबर नव्हती. रायगडावर राजारामाचे मंचकारोहण झाले. परंतु हया कटाचा सुगावा संभाजीला लागला व आण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांनी पन्हाळ गडावर संभाजीला कैद करण्या अगोदरच संभाजीने पन्हाळा सोडला व रायगडावर येऊन त्याने हया कटाचा पूर्णपणे बिमोड केला. मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो यांना कैद केले. मात्र मातोश्री सोयराबाईंवर त्याने कोणत्याही स्वरूपाचा राग धरला नाही. तसेच स्वराज्याच्या बाहेर ह्यातील कोणतीच खबर जाऊ दिली नाही. कारण समर्थांना त्यांनी पितृत्व मानले होते. त्यांच्या उपदेशाप्रमाणे ते वागित होते.

'श्रेष्ठी जेजे मिळविले । त्यासाठी भांडत बैसिले ॥
तरी मग जाणावे फावले । गनामासी ॥ [७२]

या समर्थ उपदेशाप्रमाणे ते वर्तत होते.

स्वराज्याचा कारभार सुरळीत सुरू झाल्यानंतर कैद केलेल्या मोरोपंत व आण्णाजीला संभाजीने कैद मुक्त केले. मोरोपंत त्यानंतर वृद्धाप काळाने वारले. तेव्हा संभाजी दुःखी झाले त्याने निळोपंताला पंतप्रधानाचे अधिकार दिले. आणि आण्णाजी दत्तोला पुनश्च मुजूमदार पदावर रूजू केले. संभाजीराजे काळाच्या ओघात सर्व विसरले.

सकल लोक एक करावे । गनिमा लाटून काढावे ॥[७३] असे वागू लागले मात्र सोयराबाई , आण्णाजी पुन्हा एकत्र आले व त्यांनी संभाजीस दगा करून मारण्याचा कट केला. व त्यात आण्णाजी, बाळाजी आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद या शिवाजींच्या काळातील कर्तबगार मुत्सद्यांनी कटात आपला सहभाग दिला. व बापाविरूद्ध बंड केलेल्या अकबरालाही हयात ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु संभाजीच्या जाज्वल्य व्यक्तिमत्वाने भारावलेल्या व त्याच्या मदतीच्या अपेक्षेने आलेला अकबराने हा कट संभाजीच्या कानी घातला.

ज्यांचे पूर्वीचे सर्व अपराध पोटात घालून संभाजीने त्यांना उदार अंतःकरणाने क्षमा केले. त्यांनी पुन्हा आपला घात करण्यासाठी दगाबाजीचा कट करावा ही गोष्ट संभाजीला सहन झाली नाही व त्यांनी या कटात सामील असणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा दिली.

राजद्रोह्यांना उचित अशीच शिक्षा संभाजीने दिली त्यात गैर काही केले नाही.[७४] कट उघडकीस आल्यानंतर सोयराबाईने आत्महत्या केली की तिचा खुन झाला की ती नैसर्गिक मृत्यू पावली हया बद्दल

कोणताच अधिकृत पुरावा नाही. परंतु शिवाजी सावंतांनी तीने आत्महत्या केली असे चित्र रंगवून इतिहासावर नव्यानेच प्रकाश टाकलेला दिसतो.

स्वराज्यावर येऊ घातल्या संकटांना तोंड देत स्वकीयांच्या कट कारस्थानाचा बिमोड करीत, प्रजेचे हित बघत राज्य कारभार करण्याऱ्या संभाजीस अखेर स्वजनांनीच फसविले आणि मराठ्यांच्या राजाचा अंत्यत दुर्दैवी मृत्यू झाला.

## ८) युद्ध संमुख राजा संभाजी :-

संभाजी गादीवर येताच स्वराज्याच्या शत्रुंनी उचल खाललेली दिसते. शिवाजी महाराज हयात असताना त्यांच्या राजवटीत जे संकट स्वराज्यावर आले नाही, ते संकट त्यांच्या पश्चात औरंगजेबच्या रूपाने स्वराज्याला गिळंकृत करण्यासाठी पुढे सरसावू लागले. या संकटाला देखील संभाजी राजांनी मोठया निकराने विरोध केलेला दिसतो. औरंगजेबच्या मुअज्जम, कामबक्ष, झुल्फीकार खान, शहाबुद्दीन, बक्षी राहुल्लाखान, असदखान, दाऊदखान यांना संभाजीने सहज परतविले दिसते. अशा रितीने औरंगजेबचा आणि संभाजीचा संघर्ष तीन वर्ष सुरू होता.

या दरम्यानच्या काळात संभाजी राजांनी जंजिरा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या या अफाट प्रयत्नांचा शेवट यशात नव्हता. याची खंत त्यांना लागून राहिलेली दिसते. आपल्या राजवटीच्या काळात त्यांनी काही नवे किल्ले उभारले, जुन्या किल्ल्यांची डागडुजी सुद्धा करून घेतली. तसेच शस्त्रास्त्रांचे नवे कारखाने उभे केले. नव्याने सैन्य संचणी, तसेच एकाचवेळी सर्व शत्रुंनी उचल खाऊ नये म्हणून काळपरत्वे मुत्सद्दी राजकारणाचे डावसुद्धा खेळले. तसेच औरंगजेबाचे संकट परतविण्यासाठी दक्षिणेतील सर्व शाहय एकत्र करण्याचा प्रयत्न सुद्धा केला.

संभाजी राजांचा पोर्तुगेज, डच, फ्रेंच, सिद्दी, इंग्रज यांच्या संबंध आला. मात्र यातील इंग्रजांनी शिवाजी राजांना काही काळ उपद्रव दिला होता परंतु त्याच्या पराक्रमामुळे इंग्रजांना नमते धोरण स्विकारावे लागले. परंतु संभाजी राजांच्या काळात त्यांनी पुनश्च उचल खाल्ली. परंतु संभाजी राजांनी देखील जेव्हा आपल्या भीमपराक्रमाची चुणूक त्यांना दाखविली तेव्हा त्यांनी आपले मवाळकीचे जुनेच धोरण स्विकारले. एकूणच संभाजी राजांना आपल्या हयातीत स्वस्थतेचे चार क्षण घालविता आलेले दिसत नाहीत.

अशा या झंझावती जीवन जगणाऱ्या संभाजी राजांच्या ताकदीचे जे मोल सात दर्यापार , टोपीकर दरबाराला कळले होते. ते या देशीचे असून, आप्तेष्ट असून, कैकांना कळले नव्हते ! लंडन

दरबाराने तर राजांना 'युद्ध सन्मुखवीर' म्हंटले होते.[७५]

## ९) प्रजापालनाची कर्तव्य पार पाडणारा राजा संभाजी :-

सिंहासनावर आल्यानंतर संभाजी राजांना अंतर्गत आणि परसत्ताक प्रश्न सोडविण्यात बरीच शक्ती खर्च करावी लागली होती. त्यांना आणीबाणीच्या अनेक प्रसंगांना तोंड दयावे लागले होते. स्वराज्याला चारी बाजूंनी शत्रुंनी वेढले होते. अशा परिस्थितीतून जात असताना देखील त्यांनी प्रजेकडे दुर्लक्ष केलेले दिसत नाही. शत्रुने मुलूख लुटला तरी संभाजीराजे रयतेला सवलती देत असत. कोणी काही कारणाने परागंदा झाले तर त्यांना प्रोत्साहन देऊन पुर्नवसन करण्यासाठी सूट दिली जाई. ओसाड पडलेल्या जमिनीत लोकांना पुन्हा शेती करावी म्हणून जास्तीत जास्त सवलती देण्यात येत असत. काही लोक थकबाकी थकली म्हणून धास्तीने गाव सोडून जात परंतु संभाजीराजे त्यांनी आपपल्या गावी येऊन रहावे म्हणून अभय देतात. तसेच आपल्या सैन्याकडून आपल्या राज्यातील शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होऊ नये. याची देखील संभाजी राजे दक्षता घेताना दिसतात. तसेच गुलामांच्या व्यापारावर ते निर्बंध आणताना दिसतात.

सारांश -

निश्चयाचा महामेरू । बहुतजनांस आधारू ॥

अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥[७६]

शिवाजी महाराजांसाठी निघालेल्या या समर्थ बोलांना प्राणापलिकडे जपणारा संभाजी होता. असे शिवाजी सावंतांनी सिद्ध केले आहे.[७७]

छ. संभाजी राजे हे शिवाजी महाराजांसारख्या लोकोत्तर पुरूषाचे पुत्र होते. साहजिकच समाज त्याच्याकडून त्याच्या वडिलांच्याच गुणांची अपेक्षा करतो. मात्र लोकोत्तर पुरूष हे प्रत्येक पिढीत जन्म घेत नसतात. मात्र त्यांचा वारसा हा चालत असतो. संभाजी राजांनी आपल्या व्यसनी स्वभावापायी राज्य बुडविले असा त्यांच्या वर जो आरोप करण्यात येतो. तो सर्वथैव चूक असल्याचे सावंतांनी दाखविली आहे. कारण नऊ वर्षासारख्या छोटया कालावधीत त्यांनी जी कल्पकता, कर्तव्यबुद्धि, कारभारातील दक्षता, काटेकोरपणा, बाणेदारपणा दाखविला तसेच त्यांनी औरंगजेबाने दिलेले क्रूर मरणही ज्या तडफेने स्विकारले. त्यावरून ते खंबीर मनाचे होते. मनाचा हा खंबीरपणा त्यांच्या वाटयाला आलेल्या संघर्षमय जीवनातूनच त्यांना लाभला व असा खंबीरपणा व्यवसनांध व्यक्तींजवळ नसतो. मानस शास्त्रीय दृष्टीकोन स्विकारून सावंतांनी 'छावा' चे लिखाण केले आहे. मात्र असे लेखन करीत

असताना त्यांनी शिवाजी राजांच्या कर्तृत्वाला कुठेसुद्धा न्युनता न देता आपला कार्य भाग उरकलेला दिसतो.

संभाजी राजांना बदनाम करण्यात त्यांचे घरचे शत्रु राजकीय वर्तुळातील शत्रु, आणि त्यांच्याशी सहानुभूती बाळगून इतिहास लेखन करणारे असे सर्वच संभाजी राजांचे (हितशत्रू) स्वकीय व स्वजन असूनही त्यांच्या बदनामीस कारणीभूत ठरतात. या दृष्टीने संभाजी राजे गुणवान असूनही या शत्रुंचा पूर्णपणे बंदोबस्त करण्यात ते अपयशी ठरले. आणि परक्या शत्रुंच्या (महाशत्रुच्या) ताब्यात गेले. स्वराज्याचा कारभार ताब्यात घेतल्या नंतर काही कालावधीतच संभाजीराजे स्वकीय परकीय शत्रुच्या ताब्यात गेले असले तरी त्यांनी हिंदवी स्वराज्यासाठी जो दीर्घकाळ लढा दिला त्याचा जरी नुसता विचार केला तरी संभाजीची योग्यता लक्षात येऊ शकते. असे असले तरी ते शिवाजींसारख्या नरसिंहाची बरोबरी करू शकले नाही. तर ते त्याचा 'छावा' ठरले. म्हणून हया कादंबरीचे 'छावा' हे शीर्षक समर्पक ठरते.

शिवाजी सावंतांनी संभाजी राजांच्या व्यक्तिरेखेला ऐतिहासिक सत्याचा अपलाप होऊ न देता न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.